# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ४६२/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. जे. डी. रॉड्रीग्ज**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. अभियंता (घकव्य) पी/दक्षिण विभाग कार्यालय,
सी.टी.एस.क्र.७४६, व्हिलेज पहाडी, स्वामी विवेकानंद मार्ग,
गोरेगाव (पश्चिम) मुंबई -४०० १०४

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. अभियंता (घकव्य) पी/दक्षिण विभाग कार्यालय,
सी.टी.एस.क्र.७४६, व्हिलेज पहाडी, स्वामी विवेकानंद मार्ग,
गोरेगाव (पश्चिम) मुंबई -४०० १०४

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २२.०१.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १०.०१.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र.मु.मा.आ.नों.क्र. ९७७/२०१८ रा.मा.आ.अपील क्र. ४५५/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. १६.०९.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना ज्या वर्षी माहिती विचारलेली आहे त्यावेळची निविदामध्ये ज्या अटी व शर्ती घालण्यात आले होते त्याची प्रत १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाव्दारे माहितीचा अधिकार अधिनियमचे कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावी. या आदेशासह अपील निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. १७.१०.२०१९ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (SWM), बृहन्मुंबई महानगरपालिका सहा. आयुक्त, पी/दक्षिण विभाग, गोरेगाव (प.), मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. ०७.०१.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (घकव्य), बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/ दक्षिण विभाग, गोरेगाव (प.), मुंबई यांनी त्यांचा अहवाल दि. २४.०१.२०२० रोजी व पुन्हा दि. ०१.०१.२०२५ आयोगास सादर केला.

..२/-

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा अहवाल दि.२४.०१.२०२० आयोगाच्या निदर्शनास आणून नमुद केले की, आयोगाचे आदेश दि. १६.०९.२०१९ नुसार तक्रारकर्ता यांना दि. २४.०९.२०१९ माहिती पाठविण्यात आली व उर्वरित माहिती दि. ११.१०.२०१९ रोजी निशुल्क स्वरुपात देण्यात आली. तसेच, जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांचे दि. ३१.१२.२०२४ रोजीचे पत्र आयोगासमोर सादर केले. त्यामध्ये तक्रारकर्ता यांनी नमुद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.०९.२०१९ व दि. ११.१०.२०१९ रोजी निशुल्क स्वरुपात मला माहिती उपलब्ध करुन दिली असून त्याबाबत मी समाधानी आहे व आता त्याबाबत माझी कुठलीही तक्रार नाही.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २४.०१.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**